**अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ९७/२०२५**
**निशाणी क्र. २४**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. वडकी** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
**प्रकाश नथ्थुजी देहारकर** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. १** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | पवनगिर अनंतगिर गिरी |
| वय अंदाजे ४५ वर्षे | धंदा– नौकरी, सहाय्यक अभियंता म.रा.वि.वि.क. ढाणकी, ता. उमरखेड |
| राहणार | ढाणकी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. यु. के. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

ऑगस्ट २०२१ पासून सन २०२४ पर्यंत मी वडकी ता. राळेगाव जि. यवतमाळ येथे सहाय्यक अभियंता म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (म.रा.वि.वि.क.म.) मध्ये कार्यरत होतो. दिनांक १५/११/२०२३ रोजी घटना घडली. त्यादिवशी मला ग्राहकाचा फोन आला की पिंप्रि या गावामध्ये कृषी पंप मोटर चालविण्याकरीता सातशे फूट अवैध केबल टाकलेली आहे व त्याव्दारे विद्युत चोरी होत आहे. त्यावेळी मी व माझे सहकारी प्रधान तंत्रज्ञ श्री मुकूंद जाधव व सहकारी श्री खंडाळकर व दशरथ ठाकरे यांच्यासोबत देहारकर यांच्या शेतात पोहोचलो. त्यावेळी तेथे मला असे आढळले की श्री देहारकर यांच्या शेतापासून सातशे फूट लांब असलेल्या एका विद्युत खांबावरुन, काळया रंगाच्या केबलव्दारे विज चोरी होत आहे. त्यामुळे मी श्री खंडाळकर यांना आदेश दिला की सदर विद्युत खांबावरुन काळया रंगाचा केबल काढून टाका. सदर आदेशावरुन त्यांनी तो काळा केबल पोलवरुन काढून खाली टाकला. त्याच दरम्यान श्री प्रकाश देहारकर व त्यांचे वडिल हे घटनास्थळी म्हणजे श्री देहारकर यांच्या शेतात पोहोचले. त्यावेळी श्री प्रकाश देहारकर व त्यांचे वडिलांनी माझ्याशी वाद घातला व मला म्हटले की ''सदर केबल का काढले''. त्यावर मी उत्तर दिले की ''सदर केबल ही अवैधरित्या

टाकण्यात आलेली आहे, त्यामुळे मी ती काढून घेत आहे". त्यानंतर आरोपी प्रकाश देहारकर याने खाली पडलेल्या केबलचे एक टोक हातात धरुन मला त्या केबलने जोर–जोरात मारणे सुरु केले व त्याने मला ढकलून खाली पाडले. त्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या माझ्या सहकार्यांनी मला आरोपीपासून सोडविले. त्यानंतर मी तेथून निघून गेलो व मी वडकी पोलीस स्टेशनला आलो. त्यानंतर मी आरोपी प्रकाश देहारकर याच्या विरोधात पोलीस स्टेशनला कैफियत दिली. कैफियत आता मला दाखविली, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **ती कैफियत निशाणी क्रमांक २५ वर आहे**. प्रथम खबर अहवाल आता मला दाखविला, त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक २६ वर आहे.** मला ज्या केबलने आरोपीने मारहाण केली तो केबल आता मला दाखवला, तो तोच असून त्याला **आर्टीकल अ** देण्यात येत आहे. मला ज्या व्यक्तीने केबलने मारहाण केली तो व्यक्ती आज न्यायालयात आरोपी म्हणून हजर आहे. मी आरोपीला ओळखतो.

<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. डी. सोनटक्के यांचे मार्फत सुरु –</u>

२. हे म्हणणे खरे आहे की म.रा.वि.वि.क.म. च्या वेगवेगळया तिन शाखा आहे व त्या शाखा निर्मिती, वहन आणि वितरण अशा आहे. म.रा.वि.वि.क.म. च्या वितरण शाखे मध्ये मी कर्तव्यावर होतो याबाबत आमच्या कार्यालयामध्ये दस्तऐवज उपलब्ध असतो. वडकी चे कार्यालय हे यवतमाळ विभागाच्या अधिनस्त येते. विज चोरी च्या घटनेबाबतची नोंद सामान्यतः आमच्या कार्यालयामध्ये घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की **ग्राहकांचे तक्रार रजिष्टर** आमच्या कार्यालयामध्ये असते. हे म्हणणे खरे आहे की ज्या ग्राहकाने केबल टाकून विज चोरी केल्याबाबत मला फोनव्दारे माहिती दिली, त्याची नोंद आमच्या कार्यालयामधील **ग्राहकांचे तक्रार रजिष्टर** मध्ये घेण्यात आलेली नाही.

३. मी पोलीसांना कैफियत देतांना हे सांगीतले नव्हते की *"त्यादिवशी मला ग्राहकाचा फोन आला की पिंप्रि या गावामध्ये कृषी पंप मोटर चालविण्याकरीता सातशे फूट अवैध केबल टाकलेली आहे व त्याव्दारे विद्युत चोरी होत आहे"*.

४. हे म्हणणे खरे आहे की विज चोरी पकडण्याकरीता मला अधिकार देण्यात आले होते, त्याबाबतचे अधिकार पत्र किंवा आदेश मी पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की कथित घटनास्थळाच्या शेताचा गट नंबर किंवा सर्वे नंबर बाबतचे दस्तऐवज, तसेच त्या शेतामध्ये विहिर असल्याबाबतचे दस्तऐवज, मी घेतले नाही. हे म्हणणे खरे आहे की कथित घटनेच्या पूर्वी माझा व आरोपी प्रकाश देहारकर चा कोणताही संबंध आला नाही. हे म्हणणे खरे नाही की मला आरोपीचे संपूर्ण नाव माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरील शेत वडकी कार्यालयाअंतर्गत येत असल्याचा पुरावा मी पोलीसांना दिला नाही. मी, श्री मुकूंद जाधव, श्री खंडाळकर व दशरथ ठाकरे हे एकत्र गेलो होतो. श्री खंडाळकर व दशरथ ठाकरे हे खाजगी लोक आहेत व ते आमच्या कार्यालयाशी संबंधीत नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की ते कंत्राटी मजुर आहेत. ते कंत्राटी मजुर असल्याबाबतचा पुरावा मी पोलीसांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी पोलीसांना कैफियत देते वेळी असे सांगीतले नव्हते की ते कंत्राटी मजुर आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की ते कंत्राटी मजुर होते.

५. कथित घटनेच्या दिवशी माझ्याजवळ मोबाईल होता. देहारकर यांचे शेत व विहिर यांच्यामधील अंतर मी मोजले नाही.

**(मध्यांनाची वेळ झालेली असल्यामुळे साक्षीदाराची उलटतपासणी तहकूब करण्यात आली.)**

(पी.एस.इंगळे)
दिनांक - २०/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

**<u>साक्षीदाराची उलटतपासणी मध्यांतरानंतर शपथेवर आरोपींच्या वकिलांमार्फत सुरुः</u>**

६. मी माझ्या कैफीयतीमध्ये असे नमूद केलेले नाही की "***श्री देहारकर यांच्या शेतापासून*** सातशे फूट लांब असलेल्या एका विद्युत खांबावरुन, काळया रंगाच्या केबलव्दारे विज चोरी होत आहे. मी माझ्या कैफीयतीमध्ये असे नमूद केलेले नाही की "***त्यांचे वडिल हे***

घटनास्थळी म्हणजे श्री देहारकर यांच्या शेतात पोहोचले". मी माझ्या कैफीयतीमध्ये असे नमूद केलेले नाही की "मला ढकलून खाली पाडले ".

७. नोव्हेंबर महिन्यामधे कोणती पिके शेतामध्ये असतात, याची माहिती मला नाही.

**प्रश्न–** जप्त सातशे फूट केबल समांतर एका टोकापासून ते शेवटच्या टोकापर्यंत सलग असा बांधता येत नाही ?

**उत्तर–** तसा बांधता येत नाही.

८. जप्त केलेल्या केबल सारखा केबल आमच्या कार्यालयामध्ये उपलब्ध राहू शकतो. जप्त केबलवर मी माझे ओळखीचे चिन्ह नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी जेव्हा पोलीस स्टेशनमध्ये कैफियत दिली त्यावेळेस माझ्याजवळ आरोपीच्या नावाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा नव्हता.

**प्रश्न–** विज चोरीच्या प्रकरणात केबल कापण्याकरीता गेल्यावर केबल कापल्यानंतर माझी कार्यालयीन ड्युटी संपते ?

**उत्तर–** हे म्हणणे खरे नाही.

९. विज चोरीच्या प्रकरणामध्ये अगोदर आम्हाला त्याबाबतचे विद्युत देयक द्यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की ते विद्युत देयक जर ग्राहकाने भरले नाही तर त्याबाबत त्या ग्राहकावर विद्युत चोरीची केस होते. हे म्हणणे खरे आहे की कथित घटनास्थळाच्या बाजुला आमच्या कार्यालयाचे रोहीत्र (Transformer) कार्यरत होते व त्यावेळी विद्युत पुरवठा सुध्दा चालू होता, याबाबत चे दस्तऐवज मी पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळाच्या जवळ रोहीत्र (Transformer) नव्हते व विद्युत पुरवठा सुध्दा सुरु नव्हता.

१०. हे म्हणणे खरे आहे की आरोपीला विद्युत चोरी केल्याबददल देयक मी अद्याप पर्यंत दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या आजुबाजुला अनेक लोकांचे शेत आहेत. हे म्हणणे खरे आहे की श्री मुकूंद जाधव, श्री खंडाळकर व दशरथ ठाकरे हे माझ्या नेहमीच्या परिचयाच्या व्यक्ती आहे.

११. कधी–कधी शासन विद्युत पुरवठा मोफत पुरविते. दिनांक १५/११/२०२३ पासून ते आजपर्यंत मी आरोपीच्या विरोधात विज चोरीची तक्रार केली नाही. माझ्याजवळ स्वतःचे दुचाकी वाहन आहे. हे म्हणणे खरे नाही की खेडयामधील रस्ते ओबड–धोबड असतात. साक्षीदार स्वतः सांगतात की कधी रस्ते चांगले असतात तर कधी ओबड–धोबड असतात. मी दुचाकी वाहनावरुन तिन वेळा खाली पडलो आहे. हे म्हणणे खरे नाही की मी म.रा.वि.वि.कं.म. चा लोकसेवक नव्हतो व मी विज चोरी पकडण्याकरीता गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मला विज चोरीबाबत कोणत्याही ग्राहकाचा फोन आला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या वर उल्लेखीत सहकार्यांना घेवून कोणत्याही कारवाईकरीता कोठेही गेलो नव्हतो.

१२. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की ''*त्यामुळे मी श्री खंडाळकर यांना आदेश दिला की सदर विद्युत खांबावरुन काळया रंगाचा केबल काढून टाका, सदर आदेशावरुन त्यांनी तो काळा केबल पोलवरुन काढून खाली टाकला, त्याच दरम्यान श्री प्रकाश देहारकर व त्यांचे वडिल हे घटनास्थळी म्हणजे श्री देहारकर यांच्या शेतात पोहोचले. त्यावेळी श्री प्रकाश देहारकर व त्यांचे वडिलांनी माझ्याशी वाद घातला व मला म्हटले की ''सदर केबल का काढले'', त्यावर मी उत्तर दिले की ''सदर केबल ही अवैधरित्या टाकण्यात आलेली आहे, त्यामुळे मी ती काढून घेत आहे'', त्यानंतर आरोपी प्रकाश देहारकर याने खाली पडलेल्या केबलचे एक टोक हातात धरुन मला त्या केबलने जोर–जोरात मारणे सुरु केले व त्याने मला ढकलून खाली पाडले, त्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या माझ्या सहकार्यांनी मला आरोपीपासून सोडविले, त्यानंतर मी तेथून निघून गेलो*

*व मी वडकी पोलीस स्टेशनला आलो, त्यानंतर मी आरोपी प्रकाश देहारकर याच्या विरोधात पोलीस स्टेशनला कैफियत दिली''.*

१३. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी कैफियत दिली. हे म्हणणे खरे नाही की आरोपी व त्याचे वडिल कथितपणे घटनास्थळावर आले नाही, तसेच आरोपीने मला मारहाण केली नाही.

१४. मला अशी माहिती मिळाली की श्री देहारकर यांनी आमच्या कार्यालयाकडे त्यांना विद्युत पुरवठा मिळण्याबाबत चा अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की श्री देहारकर यांना विद्युत पुरवठा देण्यात आला नव्हता. मला माहिती नाही की त्यामुळे श्री देहारकर यांनी आमच्या कार्यालयाच्या विरोधात ग्राहक मंचामध्ये तक्रार दाखल केली होती व ती तक्रार मंजुर करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की विद्युत पुरवठा न दिल्यामुळे आमच्या कार्यालयाच्या विरोधात केस होईल या भितीमुळे मी आरोपीच्या विरोधात खोटी कैफियत दिली व आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी–काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
दिनांक – २०/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.